साहेबराव शंकरराव ढमढेरे कला व वाणिज्य महाविद्यालय,

तळेगाव ढमढेरे, ता. शिरूर, जि. पुणे

# शैक्षणिक संशोधन समिती

# महाविद्यालयीन संशोधन धोरण

# (College Research Policy)

# महाविद्यालयीन संशोधन धोरण (College Research Policy)

## उद्दिष्टे :

1. विद्यार्थी व प्राध्यापकांमध्ये संशोधन दृष्टि विकसीत करणे.
2. विद्यार्थी व प्राध्यापकांमध्ये असणाऱ्या संशोधन वृत्तीस चालना देणे.
3. विद्यार्थी व प्राध्यापकांमध्ये संशोधनाविषयी जागृती करणे.
4. विद्यार्थी व प्राध्यापकांमध्ये जिज्ञासावृत्ती वाढविणे.
5. स्थानिक समस्यांवर संशोधन करून योग्य उपाययोजना सुचविणे.
6. महाविद्यालयामध्ये संशोधन संस्कृतीचा विकास करणे.
7. अविष्कार स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग वाढविणे.
8. इन्होवेशन स्पर्धेमध्ये प्राध्यापकांचा सहभाग वाढविणे.
9. युजीसी, सा. फु. पुणे विद्यापीठ बीओडी व इतर संशोधन संस्था अंतर्गत संशोधन प्रकल्प करण्यास प्रवृत्त करणे.
10. टांतरविद्याशाखीय संशोधनास चालना देणे.

## ध्येय धोरणे :

1. महाविद्यालयीन पातळीवर संशोधन कार्यशाळा व अविष्कार स्पर्धांचे आयोजन करणे.
2. विद्यार्थी व प्राध्यापकांना संशोधनासाठी आवश्यक असणाऱ्या मुलभूत सुविधा (संगणक, ग्रंथालय, इंटरनेट, झेरॉक्स, संदर्भ पुस्तके इ.)उपलब्ध करून देणे.
3. संशोधन करणाऱ्या विद्यार्थी व प्राध्यापकांना संशोधन प्रकल्पासाठी आर्थिक सहाय्य करणे.
4. स्थानिक समस्यांचा शोध घेण्यासाठी विविध सर्वे करणे.
5. विद्यार्थी सेमीनारचे आयोजन करणे.
6. संशोधन पेपर प्रकाशित करण्यासाठी व विविध कार्यशाळा व चर्चासत्रांना उपस्थित राहण्यासाठी आर्थिक सहाय्य करणे.
7. संशोधन कामासाठी रजा( D.L.)मंजूर करणे.

## आर्थिक तरतुद :

**1. विद्यार्थ्यांसाठी :**

अविष्कार स्पर्धा, संशोधन विषयक कार्यशाळा, विविध संशोधन विषयक प्रोजेक्टसाठी प्रत्येक वर्षासाठी 10,000/– (दहा हजार रूपये) पर्यंत अनुदान महाविद्यालयाकडून तरतुद करण्यात येत आहे.

**2. विनाअनुदानित तत्वावर काम करणाऱ्या प्राध्यापकांसाठी :**

I. प्रकाशन : विनाअनुदानित तत्वावरील प्राध्यापकांना आपले रिसर्च पेपर राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील जर्नलमध्ये प्रकाशित करण्याकरीता प्रत्येक प्राध्यापकांस शैक्षणिक वर्षाकरीता 1000/– (एक हजार रूपय) पर्यंत अनुदान मंजूर करण्यात येत आहे.

II. लघुशोध प्रकल्पाकरीता : विनाअनुदानित तत्त्वावर काम करणाऱ्या प्राध्यापकांना लघु संशोधन प्रकल्पांसाठी 50,000/– (पन्नास हजार रूपये) पर्यंत अनुदानाची तरतुद करण्यात येत आहे.

यामध्ये एका वर्षात जास्तीत जास्त 2 प्राध्यापकांना लघुशोध प्रकल्प देता येतील. एका प्रकल्पासाठी 25,000/– (पंचवीस हजार रूपये) एवढे अनुदान देण्यात येईल. दोन टप्प्यात हे अनुदान देण्याची व्यवस्था आहे. पहिल्या टप्प्यात 60 टक्के व दुसऱ्या टप्प्यात 40 टक्के एवढे अनुदान मंजूर करण्यात येईल.एप्रिल अखेरीस लघु शोध प्रकल्प पूर्ण करून महाविद्यालयाच्या प्राचार्यांपुढे तो सादर करावा लागेल.

**3. अनुदानित तत्त्वावर काम करणाऱ्या प्राध्यापकांसाठी :**

महाविद्यालयातील अनुदानित तत्त्वावर काम करणाऱ्या प्राध्यापकांसाठी सेमिनार, कार्यशाळा इत्यादीसाठी शैक्षणिक वर्षामध्ये 1000/– (एक हजार रूपये) पर्यंत अनुदान मंजूर करण्यात येईल.

**4. प्रशासकीय/व्यवस्थापकीय कर्मचाऱ्यांसाठी :**

महाविद्यालयातील व्यवस्थापकीय कर्मचारी यांना सेमिनार, ट्रेनिंग कोर्स इत्यादीसाठी शैक्षणिक वर्षाकरीता प्रत्येक कर्मचाऱ्यांना 1000/– (एक हजार रूपये) पर्यंत अनुदान मंजूर करण्यात येईल.